# राज्याला गुंतवणुकीचे सर्वोत्तम स्थान बनविणार : मुख्यमंत्री

मुंबई : उद्योगधंद्यांच्या वाढीस खीळ घालणाऱ्या नियम व कायद्यांत बदल करत तसेच परवानगीची प्रक्रिया सुलभ व गतिमान करत राज्याला गुंतवणुकीसाठीचे सर्वोत्तम स्थान देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. आपण मुंबईला 'शांघाय' नव्हे तर मुंबईला मुंबईच बनवू, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी येथे दिली.

तिसऱ्या महाराष्ट्र इकॉनॉमिक समिटचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी सोलर एनर्जी रिसर्च अॅडवायझरी कौन्सिलचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, महाराष्ट्र इंडस्ट्री अॅंड इकॉनॉमिक डेव्हलपमेंट असोसिएशनचे चंद्रकांत साळुंखे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उद्योगधंदे सुरू करण्यासाठी शासनाकडून अनेक प्रकारच्या परवानग्या




घ्याव्या लागतात. त्यामुळे औद्योगिक विकासाची गती कमी होते. हे लक्षात घेऊन शासनाने एक खिडकी योजनेला तंत्रज्ञानाची जोड दिली आहे. त्याचप्रमाणे जे जे कायदे किंवा नियम प्रगतीस अडसर ठरत असतील त्यातही बदल करण्यात येतील. गुंतवणूकवाढीसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला (एमआयडीसी) विशेष अधिकार देण्यात येणार आहेत.

कोस्टल रोडचे काम तत्काळ सुरू करणार

मुंबईतील वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेरील ताण कमी करण्यासाठी कोस्टल रोडचे बांधकाम तत्काळ सुरू करण्यात येत असल्याचे सांगून ते म्हणाले की, नवी मुंबईतील प्रस्तावित विमानतळाचे काम केंद्र सरकारच्या सहकार्याने गतीने सुरू असून या विमानतळाचा २०१९पर्यंत वापर सुरू होईल. या वेळी डॉ. अनिल काकोडकर यांना 'प्राईड ऑफ महाराष्ट्र' हा जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच के. व्यंकटरमन, अर्नेस्ट जोसेफ, राकेश सिंग, नलीन शाह, अविनाश गुप्ता यांना या वेळी स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले.